# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.)

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपिल**
**क्र.रामाआ नाशिक/द्वितीय अपिल क्र.१२८०/२०२१/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.साहेबराव दामू वाघ<br>रा.ओमकार कॉलनी,<br>गोळीबार मैदान जवळ,<br>चर्चच्या मागे, मालेगांव कॅम्प<br>ता.मालेगाव, जि.नाशिक. | संशोधन अधिकारी,<br>जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नासर्डी पुलाजवळ, नाशिक-पुणे रोड, नाशिक. | उपायुक्त,<br>जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नासर्डी पुलाजवळ, नाशिक-पुणे रोड, नाशिक. |

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक

**<u>द्वितीय अपिल सुनावणी दि.०८/११/२०२३</u>**

| मूळ अर्ज दिनांक | मूळ अर्ज ज.मा.अ. यांना प्राप्त दिनांक | ज.मा.अ. यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| ०६/०१/२०२१ | -- | -- | २२/०२/२०२१ | -- | -- |

अपिलार्थी यांनी दि.११/०५/२०२१ रोजीच्या अर्जान्वये "माहिती दिली नाही, प्रथम अपिल घेतले नाही" असे कारण नमूद करुन आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून अपिलार्थी अनुपस्थित होते.

३. अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.०६/०१/२०२१ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "दि.०१/०१/२०१३ ते दि.३१/१२/२०१५ या कालावधीतील जात प्रमाणपत्र पडताळणी संदर्भातील अधिकारी व कर्मचारी यांचे नावे व हुद्दा" इ. माहिती मागितली आहे.

४. याप्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमोर उपलब्ध असलेली कागदपत्रे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दि.२५/१०/२०२१ च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस पुरविली आहे. अपिलार्थी यांनी दाखल केलेले प्रथम अपिल संबंधित कर्मचा-याने प्रथम अपिलीय अधिकारी यांचे निदर्शनास आणून न दिल्यामुळे प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला नाही. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२७/०९/२०२१ च्या पत्रान्वये संबंधित कर्मचारी यांना चौकशी व

खात्री करुन सर्व प्राप्त अर्जांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आल्याचे दिसून येते. सबब प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केली असे म्हणता येणार नाही. अपिलार्थींनी मागणी केलेली माहिती ही सुमारे ३ वर्षांच्या कालावधीतील असून मोघम व व्यापक स्वरुपाची आहे आणि मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसून येत नाही. तसेच अपिलार्थींनी देखील द्वितीय अपिलामध्ये व्यापक जनहिताबाबत काहीही नमूद केलेले नाही.

सबब, याप्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपिल क्र.१२८०/२०२१/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

( भूपेन्द्र गुरव )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

स्थळ :- नाशिक
दिनांक :-

जावक क्र. ओ-८०६ , दिनांक :- 28 MAR 2024

राज्य माहिती आयोग नाशिक